# सायबर शिक्षा सायबर सुरक्षा अंतर्गत मार्गदर्शन वर्ग संपन्न

भिलवडी (बंधुता वृत्तसेवा) : भिलवडी शिक्षण संस्थेच्या सेकंडरी स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेज मध्ये इ. नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना क्विकहेल व महाराष्ट्र सायबर सेल विभागाच्या वतीने सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग संपन्न झाला.



यासाठी नानासाहेब महाडिक काँलेज आँफ इंजिनिअरिंग येथील कु. विनिता पाटील व ज्ञानेश्वरी जाधव यांनी मार्गदर्शन केले.

आजच्या इंटरनेट युगात सोशल मीडियाचा वाढता वापर आणि त्यामुळे दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले आहे.

यातूनच कर्ज, नोकरी संदर्भ, आँनलाइन गेम्स, विवाह यांच्या जाहिराती, व विविध लिंक्सच्या म ाध्यमातून फसवणूक केली जाते. वेगवेगळ्या अमिषांना नकळत बळी पडतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने यापासून सावधानता बाळगणे गरजेचे आहे असे आवाहन कु. विनिता पाटील व ज्ञानेश्वरी जाधव यांनी केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक एस. एल माने, पर्यवेक्षिका सौ. राजकुमारी यादव सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.